RELIANCE
Infrastructure

## सदस्यांना सूचना

सदस्यांना ह्याद्वारे कळविण्यात येत आहे की, कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ मधील नियम २० आणि २२ (''नियम''), वेळोवेळी केलेल्या सुधारणा, आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंगचे दायित्व आणि प्रकटीकरणाची आवश्यकता) विनियम, २०१५ मधील नियम ४४ सोबत वाचले असता कंपनी कायदा, २०१३ (''कायदा'') मधील कलम १०८ आणि ११० मधील तरतुदींनुसार टपाल मतदानाची सूचना आणि त्यात नमूद करण्यात आलेल्या विशेष कामकाजासंदर्भात त्याचे स्पष्टिकरणपत्र ('टपाल मतपत्रिकेची सूचना') आणि टपाली मतपत्रिका कंपनीच्या सदस्यांना पाठविण्याचे काम बुधवार, मार्च १४, २०१८ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.

सदस्यांची टपाली मतपत्रिकेद्वारे विशेष ठरावावर मंजुरी मिळविण्यासाठी (१) ज्यांचा ई-मेल ॲड्रेस कंपनी किंवा सदर सदस्यांचे असलेल्या डिपॉझिटरी पार्टिसिपन्टस यांचेपाशी नोंदविण्यात आला आहे अशा सदस्यांना ई-मेलद्वारे, (२) ज्या सदस्यांनी ई-मेल ॲड्रेसची नोंद केलेली नाही अश्या सदस्यांना शुक्रवार दिनांक ०९ मार्च २०१८ रोजी ('कट-ऑफ तारीख') नुसार नोंदणी केलेल्या पत्यावर, उलटटपाली पत्ता असलेल्या पोस्टाचे तिकिट लावलेल्या उत्तराच्या पाकिटासोबत टपाली मतदानाची सूचना आणि टपाली मतपत्रिकेची छापिल प्रत पाठविण्यात आले आहेत.

कायद्यातील नियमांसोबत वाचले असता कायद्यातील कलम ११० अन्वये उपरोल्लेखित कामकाज इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (ई-मतदान) मतदान करण्यासह टपाली मतपत्रिकेद्वारे करण्यात येईल. कंपनीच्या संचालक मंडळाने (''बोर्ड'') ई-मतदान सुविधा पुरविण्यासाठी कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड ('कार्वी' किंवा 'रजिस्ट्रार') यांची नेमणूक केली आहे.

अंतिम मुदतीच्या तारखेला म्हणजे शुक्रवार, दिनांक ०९ मार्च २०१८ रोजी ज्यांची नावे कंपनीच्या सदस्यांच्या रजिस्टरवर आहेत किंवा डिपॉझिटरीज यांचेकडे असलेल्या लाभधारक मालकांच्या रजिस्टरवर आहेत असेच सदस्य फक्त टपाली मतपत्रिकेद्वारे किंवा ई-मतदान पद्धतीने मतदान करण्यास पात्र असतील. ज्यांना टपाली मतपत्रिका मिळाली नाही अशा सदस्यांनी कंपनीकडे अर्ज करून मतपत्रिकेची दुसरी प्रत मिळवावी. अंतिम मुदतीच्या तारखेला कंपनीची सदस्य नसलेल्या व्यक्तीने टपाल मतदानाची सूचना फक्त माहितीसाठी समजावी.

टपाली मतपत्रिकेद्वारे आणि ई-मतदान पद्धतीने मतदान गुरूवार दिनांक १५ मार्च २०१८ रोजी (सकाळी १०:०० वाजता) सुरू होईल आणि शुक्रवार दिनांक १३ एप्रिल २०१८ रोजी (सायंकाळी ५:०० वाजता) बंद होईल. शुक्रवार दिनांक १३ एप्रिल २०१८ रोजी सायंकाळी ५:०० नंतर मिळालेल्या टपाली मतपत्रिका अवैध समजाव्यात आणि शुक्रवार दिनांक १३ एप्रिल २०१८ रोजी सायंकाळी ५:०० वाजता कार्वी द्वारा ई-मतदान सुविधा अकार्यान्वित करण्यात येईल.

टपाली मतपत्रिका न मिळाल्यास किंवा टपाली मतपत्रिकेची दुसरी प्रत मागविण्यासाठी किंवा ई-मतदान प्रक्रियेसह टपाली मतपत्रिकेद्वारे मतदानासंबंधी काही चौकशी किंवा तक्रार करायची असल्यास, श्री. प्रविण चतुर्वेदी, जनरल मॅनेजर, कार्वी कॉम्प्युटरशेअर प्रायव्हेट लिमिटेड, कार्वी सिलेनियम टॉवर बी, प्लॉट क्र.३१-३२, सर्वे क्र. ११६/२२, ११५/२४, ११५/२५, फायनान्शिअल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद-५०० ०३२, दूरध्वनी क्रमांक : + ९१-४०-६७१६ १५००, फॅक्स: + ९१-४०-६७१६ १७९१, टोल फ्री क्रमांक: १८००-४२५०-९९९ किंवा ई-मेल: rinfra@karvy.com, येथे संपर्क साधावा.

सदस्य कंपनी सेक्रेटरी, यांच्याशी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्यावर किंवा ई-मेल द्वारे rinfra.investor@relianceada.com येथे देखील संपर्क साधू शकतात.

टपाली मतपत्रिकेद्वारे मतदानाच्या प्रक्रियेचे सुरळीत आणि पारदर्शक पद्धतीने संयोजन करण्यासाठी श्री. अनिल लोहिया, भागिदार किंवा त्यांच्या अनुपस्थितीत श्री. रिंकित किरन उचाट, भागिदार, मेसर्स दयाळ अँड लोहिया, चार्टर्ड अकौन्टन्टस यांची स्क्रुटिनायजर म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. टपाल मतपत्रिकेचे आणि ई-मतदानाचे निकाल शनिवार, दिनांक १४ एप्रिल २०१८ रोजी सायंकाळी ५:०० वाजता किंवा तत्पुर्वी कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय आणि कॉर्पोरेट कार्यालय येथे स्क्रुटिनायजरच्या अहवालासोबत सूचना फलकावर लावून, कंपनीच्या वेबसाईटवर www.rinfra.com येथे घोषित करण्यात येतील आणि कंपनीच्या इक्विटी समभागांची नोंदणी करण्यात आलेल्या स्टॉक एक्सचेंजेसना कळविण्यात येतील.

टपाल मतपत्रिकेची सूचना आणि टपाल मतपत्रिका कंपनीच्या वेबसाईटवर www.rinfra.com येथे आणि कार्वीच्या वेबसाईटवर www.evoting.karvy.com येथे देखील उपलब्ध आहेत.

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड करिता
आशय खांडवाला
कंपनी सेक्रेटरी
एफसीएस २७८२

ठिकाण: मुंबई

दिनांक: १५ मार्च २०१८

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**
CIN: L75100MH1929PLC001530
नोंदणीकृत कार्यालय: एच ब्लॉक, १ला मजला, धिरूभाई अंबानी नॉलेज सिटी, नवी मुंबई-४०० ७१०.
दूरध्वनी: +९१ २२ ३३०३ १०००, फॅक्स: +९१ २२ ३३०३ ३६६४
वेबसाईट: www.rinfra.com, ई-मेल: rinfra.investor@relianceada.com